 नियमित दिवाणी दावा क्र.५०७/२०१८
नि.क्र.२४/ क (सोबत)

No cross order passed on 03/07/2025 is set aside by order below Exh.53.

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.03.05 17:29:41 +0530

Dt.:- 05/03/2026 Jt. Civil Judge Sr. Dn., Nilanga.

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. दावा मिळकत मी गुणाबाई नागमोडे यांच्याकडून सर्वे नं.१६५ मधील ६६ बाय १२० फुट जागा जमीन वर्षापुर्वी खरेदी घेतलेली आहे. सदर जागेचा प्लॉट मला आठवत नाही. सदर खरेदीखत मी दाखल केला आहे. त्यावेळी गुणाबाईच्या नावे ७/१२ उतारा होता. त्यावेळी सदर जमीन ग्रामपंचायत हद्दीबाहेर होती. सदर जागेचा अकृषी आदेशाची प्रत मी दाखल करु शकतो. लेआऊट मिळाल्यास मी दाखल करु शकतो. खरेदीखत झाला त्यावेळेस गुणाबाईच्या नावे ७/१२ उताऱ्यावर काय नोंद होती याबाबत मला माहिती नाही. खरेदीखतावर लिहून घेणार म्हणून माझी सही आहे. खरेदीखत करताना अकृषी आदेश, लेआऊट व ७/१२ उतारा जोडले होते. खरेदीखत करतेवेळी मी साक्षर होतो. मी दाखल केलेल्या खरेदीखतासोबत अकृषी आदेश, लेआऊट व ७/१२ उतारा जोडलेला नाही. खरेदीखत झाला त्यावेळेसचा अकृषी आदेश व ७/१२ उतारा दाखल करु शकतो.

२. गुणाबाई मयत आहे. खरेदीखतावरील साक्षीदार मला आठवत नाहीत. त्रिंबक पाटील सध्या हयात नाहीत. भानुदास काशिनाथ सुर्यवंशी व सोपान माने हयात आहेत. दावा मिळकत गुणाबाईला कशाच्याआधारे आली होती हे मला माहीत नाही. त्यावेळी गुणाबाईचा नवरा जिवंत होता. गुणाबाईला किती मुले व मुली आहेत याबाबत मला माहिती नाही. गुणाबाई ही दावा मिळकतीची मालक होती हे दर्शवणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल करु शकत नाही. खरेदीखत करण्यापुर्वी गुणाबाई व माझ्यामध्ये लेखी ठरावपत्र झाले नव्हते. सदर मिळकत मी रु.५००/- खरेदी घेतली होती. सदर रक्कम मी गुणाबाईच्या घरी जाऊन दिली होती. त्यावेळी रक्कम मिळाल्याची पोहोच व ताबा पावती केली नव्हती. खरेदीखतातील मिळकतीच्या पुर्वेस मदनसुरी-हाडोळी रस्ता, पश्चीमेस मारुती हालगरे यांची जागा, दक्षिणेस व उत्तरेस रस्ता आहे.

**प्रश्नः** खरेदीखतातील चतुःसीमेच्या जागेसंदर्भातच सदर दावा दाखल केला आहे का?
**उत्तरः** ६६ बाय १२० जागेपैकी ६६ बाय ६६ जागेसंदर्भात दावा दाखल केला आहे.

६६ बाय ६६ जागेव्यतिरिक्त असलेली जागा मी गुलाब माने यांच्या नावे तबदील केली आहे. ग्रामपंचायतकडे सदर जागा गुलाब माने यांच्या नावे झाली आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. ग्रामपंचायत रेकॉर्डला ६६ बाय १२० जागा माझ्या नावे आहे. सदर ग्रामपंचायत उतारा मी दाखल करु शकतो. दावा मिळकतीचा ग्रामपंचायत उतारा सध्या माझ्या नावे आहे. मारुती हलगरे यांना गुणाबाईने माझ्या खरेदीदिवशी जागा विक्री केली आहे.

३. माझे वडील नागोराव पाटील दोन गावचे पोलीस पाटील असून त्यांना तीन गावात २४० एकर जमीन होती. माझे वडील १९९९ साली मयत झाले. मला चार भाऊ असून आम्ही वडीलाच्या मृत्युनंतर एक वर्षानी विभक्त झालो. वडील मयत होण्याअगोदर त्यांनी

जमिनीच्या लेखी वाटण्या केलेल्या होत्या. वाटणीमध्ये दावा मिळकत माझ्या हिश्यास दाखवलेली नव्हती.

४. मला सांगवी येथे १५.५ एकर जमीन वाटणीत मिळाली होती. मी एस.एस.ई.बी. मध्ये सिनीअर ऑपरेटर म्हणून कार्यरत होतो व २००५ साली निवृत्त झालो. २००२ मध्ये मला रु.७००/- पगार होता.

**प्रश्नः** ६६ बाय ६६ व्यतिरिक्त जागा गुलाब माने यांच्या ताब्यात आहे का?
**उत्तरः** सदर जागा मी गुलाब माने यांना १०-१२ वर्षापासून राहावयास दिले आहे.

सदर जागा मी त्यांना भाडेपट्टाआधारे दिलेली आहे. किती वर्षाकरीता भाडेपट्टा करुन दिला आहे हे मला आठवत नाही. गुलाब माने याने मला दहा हजार रुपये दिले होते, परंतु ते किती कालावधीकरीता दिले होते याबाबत मी काही सांगू शकत नाही. सदर भाडेपट्टाच्या कागद मी दाखल करु शकत नाही.

५. फेब्रुवारी २००२ साली ६६ बाय ६६ जागा पैशाच्या व्याजाच्या मोबदल्यात ताब्यात दिली होती. त्यापुर्वी सदर जागा माझ्या ताब्यात होती असे दर्शवणारा ग्रामपंचायतचा उतारा मी दाखल करु शकतो. रु.२५,०००/- च्या व्याजाच्या मोबदल्यात मी सदर जागा प्रतिवादीला दिली असे दर्शवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. सदर व्यवहार हा विठ्ठल सुर्यवंशी यांच्यासमक्ष झाला होता. विठ्ठल सुर्यवंशी सध्या हयात नाही. त्यावेळी पैसे परत करण्याची मुदत ठरली नव्हती. मी प्रतिवादीला रु.२५,०००/- स्वीकारुन जागेचा ताबा परत देण्याकरीता वकीलामार्फत नोटीस दिली होती. मी वकीलामार्फत प्रतिवादीला दिलेल्या नोटीसीचा संदर्भ दाव्यात उल्लेख केला आहे, परंतु सदर नोटीस मी दाव्यासोबत दाखल केलेली नाही. प्रतिवादीकडे सावकारीचा परवाना होता किंवा कसे हे मला माहीत नाही. २००२ साली प्रतिवादीने मला रु.२५,०००/- दिले होते यासंदर्भात माझ्या सांगण्याव्यतिरिक्त लेखी पुरावा माझ्याकडे नाही. माझ्या व प्रतिवादीदरम्यान तथाकथीत व्यवहाराव्यतिरिक्त इतर कोणताही व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी माझा शेत शेजारी नाही, घर शेजारी नाही व माझा पाहुणाही नाही. प्रतिवादी सावकारी करत होता याबाबत पुरावा माझ्याकडे नाही.

६. माझ्या शपथपत्रातील पान क्र.२ परिच्छेद क्र.१ मधील "रु.२५,०००/- संदर्भात एक दस्त नोंदवण्यात आला” सदर दस्त म्हणजे मी वकीलामार्फत प्रतिवादीला दिलेली नोटीस होय. वकीलामार्फत पाठवण्यात आलेली नोटीस मी वाचून पाहिलेली होती, परंतु त्यातील मजकूर मला आठवत नाही. दावा मिळकतीसंदर्भात प्रतिवादीचा त्याच्या भावाबरोबर १० वर्षापासून वाद चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये मी त्रयस्थ पक्षकार म्हणून सामील होण्याकरीता अर्ज दाखल केला होता, सदर अर्ज कोर्टाने नामंजूर केला होता. सदर आदेशाविरुध्द मी हायकोर्टात रिट दाखल केलेले नाही. प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ च्या हक्कात दावा मिळकतीची खरेदीखत करुन दिले आहे याबाबत मला माहिती नाही. सदर खरेदीखत मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ च्या हक्कात खरेदीखत करुन दिले त्यावेळी त्याच्या नावे ग्रामपंचायतला रेकॉर्डला नाव लागले. सदर नोंद कशाच्या आधारे लागली त्याची मी लेखी माहिती घेतली नाही. सदर नोंदीबाबत मी

आक्षेप नोंदवला नाही. सदर नोंद कशाच्या आधारे लागली हे मला आजतागायत माहीत नाही. त्यावेळी ग्रामसेवक अथवा सरपंच कोण होते हे मला माहीत नाही. त्यांच्याविरुध्द मी तक्रार दिली नाही.

७. २००४ मध्ये प्रतिवादी क्र.१ ने ३३ बाय ३३ जागा प्रतिवादी क्र.३ यांस नोंदणीकृत खरेदीखताआधारे विक्री केली याची माहिती मला कधी मिळाली हे मी सांगू शकत नाही. प्रतिवादी क्र.१ ने २ ला करुन दिलेली जागा व प्रतिवादी क्र.१ ने ३ यांना विक्री केलेली जागा हीच दावा मिळकत आहे. सदर खरेदीखत मी दाखल करु शकतो. खरेदीखताचा नंबर मला माहीत नाही. सदर खरेदीखत मी पाहिले नाही. त्याबाबत मला २०१६ साली माहिती मिळाली, परंतु त्याची तारीख व महिना मला माहीत नाही. ६६ बाय ६६ जागेपैकी प्रत्यक्षात किती जागा प्रतिवादी क्र.१, २ व ३ यांच्या ताब्यात आहे, याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ ने २ व ३ च्या हक्कात करुन दिलेल्या खरेदीखताच्या चतुःसीमा मला माहिती नाही. मी ग्रामपंचायतमध्ये ट्रॅक्स भरायला गेल्यानंतर मला सदर खरेदीखताची माहिती मिळाली. सदर दोन्ही खरेदीखताच्या नकला मी घेतलेल्या नाहीत. सदर दोन्ही खरेदीखतातील चतुःसीमा या दावा मिळकतीच्या चतुःसीमा आहेत याबाबत मी निश्चीत सांगू शकत नाही. २००२ मध्ये ६६ बाय ६६ जागेचे शासकीय मुल्यांकन किती होते, याबाबत मला माहिती नाही. मी रु.२५,०००/- २००२ साली प्रतिवादी क्र.१ कडून घेतले होते त्याचा लेखी उल्लेख करुन ठेवलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, रु.२५,०००/- च्या कर्जापोटी सदर जागा मी प्रतिवादीकडे गहाण ठेवली होती.

**प्रतिवादीचे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.03.05 17:29:51 +0530

दि.०५/०३/२०२६

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.